सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय नाशिकरोड, नाशिक

दुरध्वनी क्र.०२५३-२४६२४०१ सामान्य प्रशासन विभाग crunsk-divcom@mah.gov.in

---

क्र. अभिलेख-२०२६/साशा.५/जाहीर नोटीस जा.क्र.79 दिनांक ३१/ ०७/२०२६

**विषय:- विभागीय आयुक्त कार्यालयातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे पेस्ट कंट्रोल व वाळवी फवारणी व नियोजन हॉलमध्ये दरमहा उंदिर व किटकनाशक फवारणी करीता देखभाल करार करणेबाबबत**

## जाहीर नोटीस

विभागीय आयुक्त कार्यालयातील इमारतीमधील विभागीय आयुक्त यांचे दालन, सर्व कार्यालय प्रमुख यांचे दालन व इतर अधिकारी यांचे दालन तसेच कार्यालयातील तिन्ही मजल्यावरील एकूण २० शाखा, कार्यालयातील कॅन्टीन, इमारतीमधील सर्व स्वच्छतागृह अशा सर्व ठिकाणी **वर्षातुन एकदा** पेस्ट कंट्रोल (Pest Control) व अभिलेख कक्षात वाळवी नाशक फवारणी तसेच नियोजन सभागृहात **दरमहा** उंदिर व किटकनाशक फवारणी करुन घेणेकामी या प्रसिध्दीपत्रकान्वये इच्छुक पेस्ट कंट्रोल पुरवठादार यांचेकडून सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**या करीता इच्छुक पुरवठादार यांचे कडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून आपली दरपत्रके दि.१०/०८/२०२६ पुर्वी मा.अपर आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड यांचे कडेस कार्यालयीन वेळेत सादर करावीत.**

## कामाचे स्वरूप

सदर कामाचा तपशील **परिशिष्ट – 'अ'** **(Scope of Work / Specifications)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

### परिशिष्ट – अ
### कामाचे तपशील (Scope of Work / Specifications)

| अ.क्र | कामाचे नाव | कामाचे तपशील (Specifications) | दरपत्रक सर्व करासहीत |
|---|---|---|---|
| १. | **सर्वसाधारण कीटक नियंत्रण (General Pest Control)(वर्षातून एकदा)** | कार्यालयीन इमारतीतील सर्व कार्यालयीन कक्ष, अभिलेख कक्ष (Record Room), सभागृह, जिने, व्हरांडा, स्वच्छतागृहे, स्टोअर रूम तसेच इतर सर्व अंतर्गत भागांमध्ये झुरळे, मुंग्या, माशा, डास, कोळी, सिल्व्हर फिश, पाली, बेडबग्स व इतर कीटकांच्या नियंत्रणासाठी शासनमान्य कीटकनाशकांचा वापर करून Gel Treatment, Residual Spray किंवा आवश्यकतेनुसार Fogging करणे. | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| २ | उंदीर नियंत्रण (Rodent Control) व वाळवी प्रतिबंधक उपचार (Anti-Termite Treatment) (दरमहा) | a.कार्यालयीन इमारतीच्या अंतर्गत व बाह्य परिसरात उंदरांच्या नियंत्रणासाठी शासनमान्य Rodenticide चा वापर करून प्रभावी नियंत्रण करणे तसेच आवश्यकतेनुसार Bait चे पुनर्भरण (Refilling) करणे.<br>b.कार्यालयातील लाकडी फर्निचर, कपाटे, दारे, खिडक्या, रेकॉर्ड रूम, लाकडी संरचना तसेच वाळवीचा प्रादुर्भाव आढळणाऱ्या भागांवर शासनमान्य Anti-Termite Chemical द्वारे आवश्यक उपचार करणे. | |

**अटी व शर्ती**

१. दरामध्ये सर्व कर, वाहतूक, मजुरी, साहित्य, उपकरणे व इतर सर्व खर्च समाविष्ट असावेत.

२. वापरण्यात येणारी सर्व रसायने शासनमान्य व वैध मुदतीतील असावीत.

३. काम कार्यालयीन कामकाजात अडथळा न आणता संबंधित अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पूर्ण करावे.

४. काम पूर्ण झाल्यानंतर सेवा अहवाल (Service Report) सादर करणे आवश्यक राहील.

५. काम पूर्ण झाल्यानंतर किमान ०३ महिन्यांची विनामूल्य Follow-up Service / Warranty देणे आवश्यक राहील.

६. काम समाधानकारक झाल्यानंतर व सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानंतरच देयक अदा करण्यात येईल.

७. कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारणे किंवा कोणतेही कारण न देता नाकारणे याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याकडे राहील.

८. संबंधित व्यवसायाचा वैध परवाना/नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. वैध GST नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. काम प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांमार्फत कार्यालयीन कामकाजात अडथळा येणार नाही अशा पद्धतीने करण्यात यावे. काम करतेवेळी कार्यालयीन अभिलेख, फर्निचर, संगणक, विद्युत उपकरणे व इतर मालमत्तेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. काम पूर्ण झाल्यानंतर किमान **०३ (तीन) महिन्यांच्या कालावधीत** संबंधित ठिकाणी पुन्हा किटक, उंदीर किंवा वाळवीचा प्रादुर्भाव झाल्यास कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता आवश्यक पुन्हा फवारणी करणे बंधनकारक राहील.

(अरविंद लोखंडे)
अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

Scanned with OKEN Scanner